

Old age home at Rasayani



AIDS awareness programme at the school level.



Covid-19 Response emergency support




Note books distribution for poor children at school level

# श्री समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्था रसायनी

रजि क्रं. एफ ७३१९ रायगड

एड्स रूग्ण व गरीब गरजूंकरीता मोफत रूग्णवाहीका



एड्स समुपदेशन व आधार केंद्र



किशोरवयीन विद्यार्थ्यांकरीता व्याख्यान माला




औदयोगिक क्षेत्रात एड्स जागृतीपर व्याख्यान



एच.आय.व्ही.बाधीत रूग्णांकरीता काळजी व आधार उपक्रम



एच.आय.व्ही.बाधीत निराधार महीलांकरीता भाऊबीज उपक्रम



एड्स जनजागृती रॅली





पथनाट्य या माध्यमाव्दारे एड्स जनजागृती




राजाश्रय वृध्दाश्रम
व पाळणाघर
AMB AN E














राजाश्रय वृध्दाश्रम


## बिर्ला कार्बन इंडिया कंपनीतर्फे लोहोप येथे सुरु असलेल्या


# तज्ञ डॉक्टरांच्या ओपीडी सेवेला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

रसायनी टाइम्स वृत्तसेवा:

**बिर्ला कार्बन इंडिया कंपनीच्या सीएसआर कार्यक्रमाअंतर्गत व श्री समर्थ सामाजिक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथे सुरु करण्यात आलेल्या तज्ञ डॉक्टर्स ओपीडी सेवेला सहा महिने झाले असून या सेवेमुळे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीतील रुग्णांना आरोग्य विषयक चांगली सुविधा मिळत आहे.**

आजच्या काळात आरोग्य विषयक समस्या जनतेला मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे अशातच एखाद्या तज्ञ डॉक्टरांकडे जेव्हा रुग्ण जातो तेव्हा त्याची तपासणी फी ३०० ते १००० रुपयांपर्यंत असते अशा वेळी गरीब-गरजू रुग्णांना ती परवडणारी नसते हा उद्देश ठेऊन बिर्ला कार्बन तर्फे स्त्रीरोग, बालरोग, अस्थी रोग, त्वचा रोग, नेत्र रोग, दंत रोग अशा तज्ञ डॉक्टरांची दरमहा प्रत्येकी चार या प्रमाणे ओपीडी सेवा सुरु करण्यात आली यामुळे रसायनी -पाताळगंगा परिसरातून शेकडो रुग्ण या सुविधेचा लाभ घेताना दिसत आहेत, रुग्णांना दर्जेदार औषधांचा पुरवठा ही कंपनी तर्फे करण्यात येत आहे.

ही सेवा सुरळीत चालू राहावी व याचा जास्तीत जास्त गरजू व आदिवासी समाजाला लाभ मिळावा याकरिता कंपनीचे युनिट हेड रवींद्र रघुवंशी, एच आर हेड निखिल भामरे, लक्ष्मण मोरे, डॉ. रावत, प्राथमिक आरोग्य केंद्राचे मेडिकल ऑफिसर डॉ. मंगेश देशमुख, डॉ. सीमा व श्री समर्थ सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील हे विशेष परिश्रम घेत आहेत.



या सेवेमुळे परिसरातील रुग्णांना तज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य विषयक योग्य तपासणी, औषधोपचार व मार्गदर्शन मिळाल्या मुळे त्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होईल, येणाऱ्या काळात आणखी उत्तम सुविधा देण्याचा प्रयत्न बिर्ला कार्बन कंपनी व संस्थेच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करू असे मत श्री समर्थ संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांनी व्यक्त केले.

नवराष्ट्र
www.navarashtra.com

# तज्ज्ञ डॉक्टर्स ओपीडी सेवेला उत्स्फूर्त प्रतिसाद



रसायनी, (वा.) रसायनी पाताळगंगा येथील बिर्ला कार्बन इंडिया कंपनीच्या सीएसआर कार्यक्रमांतर्गत व श्री समर्थ सामाजिक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथे सुरु करण्यात आलेल्या तज्ज्ञ डॉक्टर्स ओपीडी सेवेला सहा महिने झाले असून या सेवेमुळे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीतील रुग्णांना आरोग्यविषयक चांगली सुविधा मिळत आहे. आजच्या काळात आरोग्यविषयक समस्या जनतेला मोठ्या प्रमाणात भेडसावत आहेत. अशातच एखाद्या तज्ज्ञ डॉक्टरकडे जेव्हा रुग्ण जातो तेव्हा त्याची तपासणी फी ३०० ते १००० रुपयांपर्यंत असते. ती गरीब-गरजू रुग्णांना परवडणारी नसते, हा उद्देश ठेवून बिर्ला कार्बनतर्फे स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, त्वचारोग, नेत्ररोग, दंतरोग अशा तज्ज्ञ डॉक्टरांची दरमहा प्रत्येकी चार याप्रमाणे ओपीडी सेवा सुरु करण्यात आली.

रसायनी -पाताळगंगा परिसरातून शेकडो रुग्ण या सुविधेचा लाभ घेताना दिसत आहेत, रुग्णांना दर्जेदार औषधांचा पुरवठा कंपनीतर्फे करण्यात येत आहे. ही सेवा सुरळीत चालू राहावी व याचा जास्तीत जास्त गरजू व आदिवासी समाजाला लाभ मिळावा याकरिता कंपनीचे युनिट हेड रवींद्र रघुवंशी, एचआर हेड निखिल भामरे, लक्ष्मण मोरे, डॉ. हरीश रावत, प्रशांत गायकवाड, प्राथमिक आरोग्य केंद्राचे मेडिकल ऑफिसर डॉ. मंगेश देशमुख, डॉ.सीमा व श्री समर्थ सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील हे विशेष परिश्रम घेत आहेत.

## आणखी उत्तम सुविधा देण्याचा प्रयत्न

या सेवेमुळे परिसरातील रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टर्सकडून आरोग्यविषयक योग्य तपासणी, औषधोपचार व मार्गदर्शन मिळाल्यामुळे त्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होईल. आगामी काळात आणखी उत्तम सुविधा देण्याचा प्रयत्न बिर्ला कार्बन कंपनी व संस्थेच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करू, असे मत श्री समर्थ संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांनी व्यक्त केले.

रसायनी टाइम्स

संपादक :अनिल भोळे

दि. ५ जूलै ते ११ जूलै २००९ ● पाने ४ ● किंमत १.५० रूपया ● (रजि.नं.ओ.

# श्री समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्थेतर्फे गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप


रसायनी(प्रतिनिधी) : रसायनी येथील श्री समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्थेतर्फे समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या संस्थेतर्फे मोहोपाडा येथील १५ गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

नुकताच रसायनी टाइम्सचे संपादक अनिल भोळे यांच्याहस्ते शालेय साहित्य वाटप करण्याचा कार्यक्रम रसायनी टाइम्सच्या कार्यालयात आयोजित करण्यात आला होता.यावेळी गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी श्री समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील, उपाध्यक्ष काशिनाथ खुडे,सदस्य किरण गोपाळे,पत्रकार लक्ष्मण डुबे, बी.एस. कुलकर्णी, सुभाष वेदक उपस्थित होते.

यावेळी श्री समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून अरविंद पाटील राबवित असलेल्या सामाजिक उपक्रमाबद्दल त्यांना व त्यांच्या संस्थेला रसायनी पत्रकार संघाने शुभेच्छा दिल्या.



विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करताना रसायनी टाइम्सचे संपादक अनिल भोळे,श्री समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील, उपाध्यक्ष काशिनाथ खुडे,सदस्य किरण गोपाळे,पत्रकार लक्ष्मण डुबे, बी.एस. कुलकर्णी, सुभाष वेदक

एक अग्रेसर साप्ताहिक,

रसायनी टाइम्स

संपादक : अनिल भोळे


(रजि.नं.ओ.सी.आय.महा.५४३६/६६९७०/९७)

दि. २७ डिसेंबर २००९ ते ३ जानेवारी २०१० ● पाने ४ ● किंमत १.५० रुपया ●

येणाऱ्या नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...

# श्री समर्थ सामाजिक सेवाभावी संस्थेतर्फे एड्स रुग्णांना ऊबदार कपड्यांचे वाटप





अनाथ महिला व एड्स रुग्ण यांना स्वेटर,कानटोपी आणि हातमोज्यांचे वाटप करताना एचओसी अॅव्हर्ट प्रकल्पाच्या डॉ.मेधा देशपांडे व जेष्ठ समाजसेवक प्रकाश मालुसरे,सोबत अरविंद पाटील,ज्ञानेश्वर पाटील

रसायनी(प्रतिनिधी) : रसायनी येथील श्री समर्थ सामाजिक सेवाभावी संस्थेतर्फे परिसरातील अनाथ महिला,एड्स रुग्ण व त्यांच्या मुलांना. 'एकटे नाहीत तुम्ही साथ आहोत आम्ही' या अभियानांतर्गत स्वेटर,कानटोपी आणि हातमोज्यांचे वाटप करण्यात आले.

एचओसी अॅव्हर्ट प्रकल्पाच्या डॉ.मेधा देशपांडे व रसायनी येथील जेष्ठ समाजसेवक प्रकाश मालुसरे यांच्याहस्ते २५ जणांना स्वेटर,कानटोपी आणि हातमोज्यांचे वाटप करण्यात आले.

थंडीमुळे एड्स रुग्णांचे आरोग्य बिघडू नये या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचेश्री समर्थ सामाजिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष काशिनाथ खुडे, सौ.वैशाली पाटील,अपूर्वा शेळके,ज्ञानेश्वर पाटील,कैलास गायकवाड,अभिषेक पाटील,किरण गोपाळे आदी उपस्थित होते.

वाचकांच्या पहिल्या पसंतीचे मराठी राष्ट्रीय दैनिक

लोकमत

सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्र!

मुंबई ▮ गुरुवार, दि. २४ डिसेंबर २००९ ▮ पृष्ठे : १

## जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

रसायनी – समर्थ सामाजिक सेवाभावी संस्थेतर्फे अनाथ महिला व एचआयव्ही एड्सबा रुग्ण व त्यांच्या मुलांना जीवनावश्यक, आरोग्य शैक्षणिक गरजांची 'एकटे नाहीत तुम्ही, साथ आहोत आम्ही' अभियानांतर्गत पूर्तता करण्यात या अभियानांतर्गत संस्थेतर्फे पंचवीस गरजू स्वेटर्स, कानटोपी, हातमोजे अध्यक्ष अरविंद पाटील, डॉ. मेघना देशपांडे आणि प्रकाश मालुस यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या वेळी उपाध्यक्ष काशिनाथ खुडे, वैशाली पाटील, अ

दैनिक
www.ekarnala.com
आपल्या कुटुंबाचं स्मार्ट दैनिक
कर्नाळा
वर्ष ९ वे * अंक १० * RNI No. 71245/1999 * NMB /127/2016-20 * रायगड * गुरूवार, दि. २८ जून, २०१८

# कष्टकरीनगर येथे आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर

## ■ श्री समर्थ संस्था व लोना कंपनीचा उपक्रम

◂ कर्नाळा : राकेश खराडे



रसायनी पातालगंगा हा औद्योगिकीकरणाने नटलेला भाग आहे. येथे विविध कंपन्या असल्याने कामगारांचा लोंढा वाढत असतानाच लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यावेळी कष्टकरीसमाजाचे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याने श्री समर्थ सामाजिक संस्था आणि लोना इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या वतीने कष्टकरी नगर-रसायनी येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गुलसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील कष्टकरीनगर येथील रा.जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांची दंततपासणी करण्यात आली. यावेळी एकूण ८० मुलांची दंत तपासणी व रक्तगट तपासणी करून त्यांना औषधोपचार देण्यात आले.

आपले दात निरोगी राखण्यासाठी कशाप्रकारे निगा राखावी हे एमजीएम हॉस्पिटलातील दातांच्या डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच या भागात लहानमोठे कारखाने असल्याने या भागात कंत्राटी कामात काम करणारा कामगारवर्ग मोठ्या संख्येने आहे. त्यांची परिस्थिती हलाखीची असल्याने काही कामगार आपल्या आजाराकडे दुर्लक्ष करतात. यासाठी परिसरातील कामगारांची रक्त तपासणी करण्यात आली. शुगर, हिमोग्लोबिन, मलेरिया, रक्तगट अशा रक्ताच्या तपासण्या करण्यात आल्या.

श्री समर्थ संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील अनेक वर्ष या समाजाचे आरोग्य सुदृ रहावे या उद्देशाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्याचे कार्य करत आहेत.

या शिबिराचा १५० हुन अधिक लोकांनी लाभ घेतला यावेळी एमजीएम हॉस्पिटल; निसर्ग लेबोरेटरी यांनी सहकार्य करून आरोग्य तपासणी केली.

# मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर

रसायनी : रामप्रहर वृत्त-



पाताळगंगा हा औद्योगिकीकरणाने नटलेला भाग आहे. येथे विविध कंपन्या असल्याने कामगारांचा लोंढा वाढत असतानाच लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या वेळी कष्टकरी समाजाचे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष हौत असल्याने श्री समर्थ सामाजिक संस्था आणि लोना इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या वतीने कष्टकरी नगर-रसायनी येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी औषधोपचारही मोफत करण्यात आले.

गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील कष्टकरीनगर येथील रा.जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांची दंततपासणी करण्यात आली. या वेळी एकूण ८० मुलांची दंततपासणी व, ब्लड ग्रुप तपासणी करून त्यांना औषधोपचार करण्यात आले.

आपले दात निरोगी ठेवण्यासाठी कशाप्रकारे नीगा राखावी हे एमजीएम हॉस्पिटलमधील दातांच्या डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच या भागात लहानमोठे कारखाने असल्याने या भागात कंत्राटी कामात काम करणारा कामगारवर्ग मोठ्या संख्येने आहे. त्यांची परिस्थिती हलाखीची असल्याने काही काम गार आपल्या आजाराकडे दुर्लक्ष करतात. यासाठी परिसरातील कामगारांची रक्ततपासणी करण्यात आली. शुगर, हिमोग्लोबिन, मलेरिया, ब्लड ग्रुप अशा रक्ताच्या तपासण्या करण्यात आल्या. श्री समर्थ संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील अनेक वर्षे आरोग्य शिबिरांचे आयोजन करत आहेत. या शिबिराचा १५० हून अधिक लोकांनी लाभ घेतला. या वेळी एमजीएम हॉस्पिटल, निसर्ग लेबोरेटरी यांनी सहकार्य करून आरोग्य तपासणी केली.

शुकवार, दि. २७ जुलै २०१८ • वर्ष ११ • अंक १०

रामप्रहर

# वावेघर येथे आरोग्य तपासणी शिबिर

**रसायनी : रामप्रहर वृत्त-**

श्री समर्थ सामाजिक संस्था आणि लोना इंडस्ट्रीज लिमिटेड याच्या संयुक्त विद्यमाने रसायनी येथील वावेघर झोपडपट्टीत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या झोपड़पट्टीमध्ये मोठ्या प्रमाणात कष्टकरी समाज राहतो. कष्टाची कामे करत असताना आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत असतात. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने हा समाज याकडे दुर्लक्ष करतो. अशावेळी काही आजार हे जीवघेणे ठरतात. या समाजाचे आरोग्य सदृढ राहावे, या हेतूने संस्थेने या शिबिराचे आयोजन केले होते.

या वेळी मलेरिया, शुगर, हिमोग्लोबिन, एचआयव्ही, थायरॉइड, ब्लड ग्रुप अशा रक्तचाचण्या व डोळे तपासणी करून मोफत औषोधोपचार करण्यात आले. या वेळी एमजीएम हॉस्पिटलमधील सर्जन, मेडिसिन, अस्थिरोगतज्ज्ञ, नेत्ररोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉक्टरांनी सहकार्य केले. या शिबिराचा १३० हून अधिक लोकांनी लाभ घेतला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण अरविंद पाटील, काशिनाथ खुडे, मोहन लबडे, भीम भंडारी, दर्शना गाताडे, एमजीएम हॉस्पिटल, तसेच निसर्ग लेबोरेटरीचे लबडे यांचे सहकार्य लाभले.



सा. रसायनी टाइम्स रविवार, दि. २८ जुलै ते ०४ ऑगस्ट २०१८

# वावेघर झोपडपट्टीमध्ये आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

## श्री समर्थ सामाजिक संस्था आणि लोना इंडस्ट्रीज लिमिटेडचा संयुक्त उपक्रम

**रसायनी/प्रतिनिधी**

श्री समर्थ सामाजिक संस्था आणि लोना इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने रसायनी येथील वावेघर झोपडपट्टी मध्ये आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या झोपड़पट्टीमध्ये मोठ्या प्रमाणात कष्टकरी समाज राहतो कष्टाची कामे करत असताना आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत असतात आर्थिक परिस्थिति बिकट असल्याने हा समाज याकडे दुर्लक्ष करतो. अशावेळी काही आजार हे जीवघेणे ठरतात. या समाजाचे आरोग्य सुदृढ रहावे या हेतुने संस्थेने या शिबिराचे आयोजन केले होते. या वेळी, मलेरिया, शुगर, हीमोग्लोबिन, Hiv, थायरॉइड, ब्लड ग्रुप अशा रक्त चाचण्या व डोळे तपासणी करुन मोफत औषोधोपचार देण्यात आले. यावेळी एमजीएम तर्फे सर्जन, मेडिसिन, अस्थिरोगतज्ञ,नेत्र तज्ञ, स्त्रिरोग तज्ञ डॉक्टरांनी सहकार्य केले. १३० हुन अधिक लोकांनी शिबिराचा लाभ घेतला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण-अरविंद पाटील, काशिनाथ खुडे, मोहन लबडे, भीम भंडारी, दर्शना गाताडे, एमजीएम हॉस्पिटल, निसर्ग लॅबोरेटरी मोहोपाडा यांचे सहकार्य लाभले.



सागर रायगड
Raigad

# अरविंद पाटील 'रायगड भूषण पुरस्काराने' सन्मानित



रसायनी/प्रतिनिधी

रसायनी परिसरातील श्री समर्थ सामाजिक ,संघटनेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांना रायगड जिल्हा परिषदेकडून रायगड भूषण पुरस्कार मिळाला. त्यांनी केलेल्या नाविण्यपुर्ण व उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना सदर पुरस्कार मा.जलसंपदामंत्री सुनिलजी तटकरे यांच्याहस्ते कर्जत किरवली येथील शेलके हॉलमध्ये प्रदान करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सुरेश टोकरे, आमदार सुरेश लाड, आमदार धैर्यशिल पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष वसंत ओसवाल, जि. प. उपाध्यक्ष अरविंद म्हात्रे, समाजकल्याण सभापती गिता जाधव, प्रिया मुकादम, मनोहर पाशिलकर, चित्रा पाटील, सुदाम पेमारे, उत्तम कोळंबे, उमा मुंढे, सुर्यकांत कालगुडे, जि. प. सदस्या पुजा थोरवे, कर्जत प. स. सभापती सुवर्णा बांगारे आदि उपस्थित होते.

अरविंद पाटील यांनी रसायनी पाताळगंगा परिसरासह जिल्ह्यातील काही भागात संस्थेच्यावतीने एड्सग्रस्त रूग्णांना आधार देत त्यांना नवजीवन जगण्याची उमेद दाखविली. तसेच परिसरात एड्सविषयक जनजागृती करून समाज प्रबोधनही करत फिरता दवाखाना व रूग्णवाहिका सेवा काढल्याने त्यांना हा पुरस्कार मिळाल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ते आपल्या संघटनेच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्यक्रम राबवित असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना रायगड जिल्हा परिषदेने सदर पुरस्कारासाठी पात्र ठरविल्याचे पाटील म्हणतात. त्यांना रायगड भूषण पूरस्कार मिळाल्याने परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

रविवार, दि. २० ते २६ सप्टेंबर २०१५ सा. रसायनी टाइम्स

# अरविंद पाटील याचा अण्णा हजारेंकडून सत्कार

रसायनी/प्रतिनिधी

रसायनी परीसरातील श्री समर्थ सामाजिक संघटनेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांना राजिपरीषदेकडून रायगड भूषण पुरस्कार मिळाला. त्यांनी केलेल्या नाविण्यपुर्ण व उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना सदर पुरस्कार माजी जलसंपदामंत्री सुनील तटकरे यांच्याहस्ते.कर्जत किरवली येथील शेळके हॉलमध्ये प्रदान करण्यात आल्याने त्यांचा पद्मभूषण पुरस्कर्ते व भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे सर्वेसर्वा अण्णा हजारे यांच्याहस्ते नुकताच रायगड भूषण पुरस्कार मिळालेले रसायनी येथील अरविंद पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पाटील यांच्यासमवेत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अल्लाउद्दीन शेख, श्री समर्थ संघटनेचे यादव सुवर्णाही उपस्थित होते.

अरविंद पाटील हे आपल्या संघटनेच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्यक्रम राबवित असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना रायगड जिल्हा परिषदेने सदर पुरस्कारासाठी पात्र ठरविल्याचे पाटील म्हणतात. त्यांना रायगड भूषण पूरस्कार मिळाल्याने त्यांचे परिसरात विविध ठिकाणी नागरी सत्कार होत आहे.



दैनिक कर्नाळा
जनहिताचा निर्वाळा

# अरविंद पाटील यांचा पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या हस्ते सत्कार

**मोहोपाडा/प्रतिनिधी**


रसायनी परिसरातील श्री सर्मथ सामाजिक संघटनेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांना रायगड जिल्हा परिषदेकडून रायगड भूषण पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

यासाठी अरविंद पाटील यांचा भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे सर्वेसर्वा अण्णा हजारे यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी पाटील यांच्यासमवेत श्री सर्मथ संघटनेचे यादव सुवर्णाही उपस्थित होते. परिसरात एड्सविषयक जनजागृती करून समाज प्रबोधन करत फिरता दवाखाना व रुग्णवाहिका सेवा काढल्याने त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.



रसायनी टाइम्स
रविवार, दि. १७ ते २३ मार्च २०१९

# रक्त तपासणी व मोफत औषधोपचार शिबिर



**रसायनी/प्रतिनिधी**

श्री समर्थ सामाजिक संस्था रसायनी व लोना इंडस्ट्रीज यांच्या वतीने मोहोपाडा येथील रिक्षा चालक,ट्रांसपोर्ट चालक यांच्यासाठी रक्त तपासणी शिबीर व मोफत औषधोपचार शिबिराचे आयोजन करन्यात आले होते यामधे ब्लड ग्रुप,सी बी सी, थाइरॉइड,कैल्शियम, एच, आय,व्ही, मलेरिया अशा रक्त तपासन्या करण्यात आल्या या शिबिराचा ७२ रुगणांनी लाभ घेतला. प्रवाशांची सेवा करत असताना आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या या चालक घटकाचे आरोग्य सुदृढ राहावे शिवाय काही महागडया रक्त तपासन्या मोफत करता याव्यात या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष रायगड भुषण- अरविंद पाटील यांनी या शिबिराचे आयोजन केले होते, या शिबिरास टाकेदेवी रिक्षा चालक - मालक संघटना यांचे उत्तम सहकार्य मिळाले,

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
www.pudhari.com
शनिवार । १६ मार्च २०१९ । वर्ष ८१ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड,

# मोहोपाडा रिक्षाचालकांसाठी औषधोपचार शिबीर



**रसायनी :** श्री समर्थ सामाजिक संस्था रसायनी व लोना इंडस्ट्रीजच्यावतीने मोहोपाडा मुख्य प्रवेशद्वाराजवळ रिक्षा चालक- मालक कार्यालयात रक्ततपासणी व औषधोपचार शिबिर संपन्न झाले. या शिबिराचा रिक्षा चालक, मालक, ट्रान्सपोर्ट चालकांनी विविध तपासण्या करुन आजार जाणून घेतला. यात ब्लड ग्रुप, सीबीसी, थायरॉइड, कॅल्शियम, एचआयव्ही, मलेरिया अशा रक्त तपासण्या करण्यात आल्या. या शिबिराचा ७२ रुग्णांनी लाभ घेतला. यावेळी तपासण्या करणाऱ्या नागरिकांना मोफत औषधोपचार वाटप करण्यात आला. या शिबिरास टाकेदेवी रिक्षा चालक- मालक संघटना यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

रसायनी टाइम्स रविवार, दि. ३१ मार्च ते ०६ एप्रिल २०१९

# आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार शिबिर



रसायनी/प्रतिनिधी

श्री समर्थ सामाजिक संस्था रसायनी व लोना इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा शिवनगर आदिवासी वाड़ीत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. एम जी एम हॉस्पिटल कामोठे तर्फे स्त्री रोग, बालरोग, अस्तिरोग, सर्जन, नेत्ररोग आदी तपासण्या तज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आल्या. यावेळी तपासणी झालेल्या रुगणांना आजाराविषयक डॉक्टरांना मार्गदर्शन करुन मोफत औषधोपचार दिले. त्याचप्रमाणे ब्लड ग्रुप, सीबीसी, थाइरॉइड, अशा रक्त तपासण्या करण्यात आल्या. या शिबिराचा ११८ रुग्णांनी लाभ घेतला. कष्टाची कामे करत असताना आपल्या आरोग्य कडे दुर्लक्ष करणाऱ्या या समाज घटकाचे आरोग्य सुदृढ राहावे शिवाय काही महागडया रक्त तपासन्या मोफत करता याव्यात या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील गेली अनेक वर्ष या शिबिरांचे आयोजन रसायनी व आसपासच्या परीसरात करत आहेत. शिवनगरवाडी येथील शिबिराला लोना इंडस्ट्रीज कंपनीचे मोलाचे सहकार्य लाभले.

यावेळी निसर्ग लॅबोरेटरीचे हनुमंत लबड़े, काशीनाथ खुडे, एमजीएम हिस्पिटलचे जावेद व त्यांच्या सहकारी डॉक्टरांचे पथक उपस्थित होते.

शनिवार, १६ मार्च २०१९ रायगड पुढारी ११

## शिवनगरवाडी येथे आरोग्य शिबीर



**रसायनी** : श्री समर्थ सामाजिक संस्था रसायनी व लोना इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा शिवनगर आदिवासी वाड़ीत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. एम जी एम हॉस्पिटल कामोठे तर्फे स्त्री रोग, बाळरोग, अस्तिरोग, सर्जन, नेत्ररोग आदी तपासण्या तज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आल्या. यावेळी तपासणी झालेल्या रुग्णांना आजाराविषयक डॉक्टरांना मार्गदर्शन करुन मोफत औषधोपचार दिले. त्याचप्रमाणे ब्लड ग्रुप, सी बी सी, थाइरॉइड, अशा रक्त तपासन्या करण्यात आल्या. या शिबिराचा ११८ रुग्णांनी लाभ घेतला. कष्टाची कामे करत असताना आपल्या आरोग्यकडे दुर्लक्ष करणाऱ्या या समाज घटकाचे आरोग्य सुदृढ़ राहावे शिवाय काही महागडया रक्त तपासन्या मोफत करता याव्यात या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष रायगड भुषण- अरविंद पाटील गेली अनेक वर्ष या शिबिरांचे आयोजन रसायनी व आसपासच्या परीसरात करत आहेत. शिवनगरवाडी येथील शिबिराला लोना इंडस्ट्रीज कंपनीचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी निसर्ग लॅबोरेटरीचे हनुमंत लबड़े, काशीनाथ खुडे, एमजीएम

लोकमत दि. २८ मार्च २०१९

## आरोग्य शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मोहोपाडा** : श्री समर्थ सामाजिक संस्था रसायनी व लोना इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने शिवनगर आदिवासी वाडीत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार शिबिराचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. या शिबिराचा ११८ रुग्णांनी लाभ घेतला.

पुण्य नगरी

## शिवनगरवाडीत आरोग्य तपासणी

**रसायनी** : श्री समर्थ सामाजिक संस्था, रसायनी व लोना इंडस्ट्रीज.यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा शिवनगर आदिवासी वाडीत आरोग्य तपासणी व मोफत औषंधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. एमजीएम हॉस्पिटल, कामोठे तर्फे स्त्री रोग, बाळरोग, अस्थिरोग, सर्जन, नेत्ररोग आदी तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आल्या. यावेळी रुग्णांना आजाराविषयक डॉक्टरांना मार्गदर्शन करून मोफत औषधोपचार दिले. त्याचप्रमाणे ब्लड ग्रुप, सीबीसी, थायरॉइड, अशा रक्त तपासण्या करण्यात आल्या. या शिबिराचा

# श्री समर्थ सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांच्या प्रयत्नाने हृदयपिडीत गरजूला मिळाले जीवनदान

**रिस/प्रतिनिधी**

''जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा'' या संतांच्या ओव्यांची आस धरुन श्री समर्थ संस्थेची स्थापना करुन २४ तास तळागाळातील गोर गरीबांना, एड्स रुग्णांच्या विझणाऱ्या स्वप्नांना मायेची फुंकर देवून पुन्हा पल्लवीत करणारा एक मोठं हृदय, समाज कार्याची पदवी घेवून या शिक्षणाचा उपयोग सदैव समाजासाठी स्वतःला वाहून घेणार अरविंद पाटील यांनी खाने आंबिवली येथील दगडू पवार यांच्या कुटूंबाला मदतीचा हात दिला.



दगडू पवार यांचा ११ वर्षाचा एकुलता एक मुलगा नवनाथ हा काही महिन्यांपासून हृदयविकाराने पिडित होता. त्याच्या हृदयाला सहा एमएमचे छिद्र होते. इयत्ता सहावीमध्ये शिकणाऱ्या नवनाथच्या कुटूंबाची परिस्थिती बेताची असल्याने काही रुग्णालयात तपासणी केल्यावर डॉक्टरांनी या शस्त्रक्रियेकरीता साडेतीन लाख रुपये खर्च येणार असल्याचे सांगितले. एवढा खर्च करणे त्याच्या कुटूंबाला अशक्य होते. यामध्ये काही महिने निघून गेले. दगडू पवार यांनी सर्वतोपरी प्रयत्न करुनही कोणताही मार्ग मिळत नव्हता शेवटी त्यांनी अरविंद पाटील यांच्याशी संपर्क साधला असता अरविंद पाटील यांनी कोणताही विलंब न लावता नवनाथला तातडीने कामोठे येथील महात्मा गांधी मेमोरियल रुग्णालयात नेले तेथे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी मेडिकल सोशल वर्कर बागूल यांच्याशी रुग्णाच्या परिस्थितीबद्दल चर्चा करुन शस्त्रक्रियेचा सर्व खर्च करण्याचे आश्वासन दिले. यामध्ये राजीव गांधी योजनेअंतर्गत दीड लाख रुपये व इतर खर्च महात्मा गांधी मेमोरियल ट्रस्ट तर्फे करण्यात आला. शेवटच्या टप्प्यातील नवनाथ व यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. सहा महिन्यापर्यंत लागणाऱ्या पुढील औषधोपचाराचा खर्च अरविंद पाटील व मोहोपाडा येथील हॉटेल साई कुसुमचे संचालक यादव अण्णा सुवर्णा यांनी दिला.

एकुलत्या एक मुलाला पुर्नजन्म मिळाला. यामुळे पवार कुटूंबाच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. त्यांनी अरविंद पाटील व महात्मा गांधी मेमोरियल यांचे आभार मानले.

RNI No. : MAH MAR 43162/13/1/2013 - TC

साप्ताहिक
# संपूर्ण क्रांती

e-Mail : sampurankranti2013@gmail.com / grammitra@gmail.com
Website : http://www.grammitra@gmail.com
sampurnakranti@facebook.com

वृत्तक्रांतीसाठी नव्हे तर जनक्रांतीसाठी.....

।। पृष्ठ २४ ।। ।। मूल्य ₹ २

।। मंगळवार दिनांक २४ ते सोमवार दिनांक ३० डिसेंबर २०१३ ।।

## श्री समर्थ सेवाभावी संस्थेचा स्तुत्य उपक्रम

## एच.आय.व्ही. बाधीत गरजू महिलांना शिलाई मशिनचे वाटप




**रसायनी**–श्री समर्थ सेवाभावी संस्था रसायनी अंतर्गत विविध सामाजिक उपक्रम सुरु आहेत. यामध्ये परिसरातील एड्स आजाराचे प्रमाण नियंत्रणात राहावे या करिता एड्स जनजागृती ही विविध माध्यमांद्वार राबविण्यात येते. त्याच प्रमाणे आजाराने निराश झालेल्या रूग्णांना समुपदेशाद्वारे आंनदी जीवन जगण्याची उमेद निर्माण करुन त्यांच्या जीवनावश्यक गरजांची पुर्तता करण्यात येत.

यावेळी १ डिसेंबर जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधुन संस्थेच्या 'एकटे नाहीत तुम्ही साथ आहोत आम्ही' या उपक्रमाअंतर्गत २० बाधीत महिलांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. पतीच्या निधनानंतर स्वतःच एचआयव्ही सह जीवन व्यथित करत असताना दोन-तीन मुलांचीही जबाबदारी या महिलांवर असते. यामुळे खूपच हालाखीचे जीवन जगावे लागत असून, याकरिता या महिलांचा आधार म्हणून स्वयंरोजगार मिळावा या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

या उपक्रमाद्वारे बाजारातील प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आहे. यावर पर्याय म्हणून कापडी पिशव्या घ्या, या महिलांकडून शिवून घेण्यात येणार आहेत व त्यांचे मार्केटिंग ग्रामपंचायतीद्वारे बाजारातील दुकान मालकांमध्ये करण्यात येणार आहे. यांतून येणारे उत्पन्न हे थेट या महिलांना मिळून त्यांना स्वयंरोजगार प्राप्त होऊन त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यात मदत होणार आहे असे अरविंद पाटील यांनी सांगितले. या शिलाई मशिन संस्थेला आल्किल अमाईन्स, सिप्ला लिमिटेड, आय.व्ही.आर.सि.एल. ट्रक टर्मिनल, दिपक चौधरी यांच्याकडून देण्यात आल्या.

या कार्यक्रमाला सिप्ला कंपनीच्या उल्का धुरी, अल्किल अमाईन्स कंपनीचे जनरल मॅनेजर मिलिंद देशमुख, विनोद वायदंडे, वासांजे ग्रामपंचायतीचे सरपंच रोशन राऊत, ग्रामसेवक मोहन दिवकर आय.व्ही. आर.सी.एल. कंपनीचे राम आयराव, पुरुषोत्तम मंडोले, दिपक चौधरी, यादव अण्णा सुवर्ण, काशिनाश खुडे, दत्ता देसाई, कृष्णाशेठ पारंगे आदि मान्यवर उपस्थित होते.

सा. रसायनी टाइम्स रविवार, दि. ०९ ते १४ जुलै २०१७

# श्री समर्थ सामाजिक संस्थेचे कार्य कौतुकास्पद : अर्चना ठाकूर



रसायनी/प्रतिनिधी

''वीर वुमेन फाऊंडेशन पनवेलच्या सर्व सभासदांनी श्री समर्थ सामाजिक संस्थेच्या कार्यालयास भेट देवून संस्था राबवित असलेल्या सामाजिक उपक्रमांबद्दल माहिती घेतली, जागतिक समस्या बनलेल्या एड्स आजाराची जागृती संस्थेमार्फत करून बाधीत रुग्णांमध्ये समुपदेशनाद्वारे आनंदी जीवन जगण्याची उमेद निर्माण करण्याचे कार्य संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील करत आहेत. याबद्दल वीर वुमेन फांऊडेशनच्या अध्यक्षा अर्चना ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यानंतर मोहोपाडा परिसरातील वासांबे शिदी, शीवनगर, खोंडा या आदिवासी वाड्यातील विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले यावेळी वीर वुमेन फाऊंडेशनच्या अर्चना ठाकूर, सीमा जैन, श्रुती मिश्रा, अलका मेहता, पुनम जैन, नम्रता बांठीया, अर्चना सोनी, जि. प. शाळा शीवनगरचे मुख्याध्यापक मंदार वेदक, अरविंद पाटील, यादव अण्णा, काशिनाथ खुडे, भंडारकर व अन्य शिक्षकवर्ग उपस्थित होते.


## वीर वुमेन फाऊंडेशन तर्फे आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप





दैनिक सागर रायगड
Raigad
रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, मुंबईसह पाच स्वतंत्र आवृत्त्या

# व्यसने टाळून शरीर संपत्ती कमवा : अरविंद पाटील



**खोपोली/प्रतिनिधी**

तरुणांनी व्यसनांच्या आहारी न जाता सुदृढ शरीर संपत्ती कमवा, असे आवाहन श्री समर्थ सेवा भावी संस्था अध्यक्ष अरविंद पाटी यांनी भोकरपाडा येथे आयोजित आरोग्याविषय कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना केले.

भोकरपाडा येथे एलएनटी कन्स्ट्रक्शन येथे प्रशिक्षण घेण्यासाठी देशभरातून हजारो युवक येत असतात. तसेच त्यांना तीन महिन्याचे प्रशिक्षण दिले जात असते. अनेक युवकांना नोकरी मिळावी, शिवाय स्वत:च्या पायावर तरुणांनी उभे राहावे. या प्रशिक्षणांच्या माध्यमातून काही शिक्षण घेण्यासाठी अनेक युवक येथे येत असतात. एलएनटी हे जगभरात अनेक ठिकाणी ब्रीज, बिल्डिंग तसेच अन्य कामेही करत असल्याने या युवकांना आरोग्य विषयी माहिती मिळावी, या उद्देशाने श्री समर्थ सेवा भावी संस्था अध्यक्ष अरविंद पाटील तथा रायगड भूषण पुरस्कृत यांच्या माध्यमातून युवकांना आरोग्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या कामाचे प्रशिक्षण घेत असतात आरोग्य सांभाळणे तेवढेच महत्वाचे असते. मात्र आपणास कुठल्याही पद्धतीचे आजार निर्माण होणार नाही, यासाठी आजार निर्माण होणार नाही, यासाठी प्रत्येकाने दक्षता घेणे गरजेचे, प्रशिक्षण घेत असताना, शरीर तंदुरुस्त असणे गरजेचे आहे.

यावेळी एड्स आणि व्यसनमुक्ती या विषयावर युवकांना मार्गदर्शन करण्यात आले. युवकांनी व्यसनांच्या आहारी न जाता शरीर संपदा कमवली पाहिजे. यासाठी मादक पदार्थ अन्य नशेली औषधांपासून दूर राहणे अदिशय महत्वाचे. एकदा व्यसनाची सवय लागी की आपण त्यांच्या आहारी जात असतो. मात्र यापासून दूर राहणे अतिशय चांगले असते म्हणून व्यसने टाळा शरीर संपती कमवा, असे मार्गदर्शन अरविंद पाटील यांनी व्यक्त केले.

रायगड जिल्ह्यातील एक अग्रेसर साप्ताहिक

30

# रसायनी टाइम्स

पोस्ट परवाना नं. G/MH/MR/NMD/105/2013-15

वर्ष ११ वे

संपादक : अनिल भोळे

रविवार, दि. १७ ते २३ मे २०१५ ● पाने ४ ● किंमत २ रुपये ● (आर.एन.आय. नं. ६६९७०/९७) ● पनवेल

## श्री समर्थ सेवाभावी संस्था रसायनी आयोजित कन्ट्रंक्शन लेबर करीता आरोग्य तपासणी शिबिर

**रसायनी/प्रतिनिधी**

श्री समर्थ सेवाभावी संस्थे अंतर्गत विविध उपक्रम सुरु आहेत. यामध्ये एड्स जनजागृती आदिवासी, झोपडपट्टी भागांत फिरता दवाखाना, २०० आदिवासी-गरजु मुलांना वर्षभर शैक्षणिक मदत, रुग्णवाहिका, १०० दारिद्र्य रेषेखालील व एचआयव्ही बाधीत महिलांसाठी शिलाई मशिन देऊन कापडी पिशवी उपक्रम, बेरोजगारांसाठी रोजगार, किशोर वयीन व्याख्यानमाला, व्यसनमुक्ती व्याख्याने असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

दिनांक १३ मे रोजी सेबी प्रोजेक्ट येथील स्थलांतरीत कन्ट्रंक्शन लेबर करीता आरोग्य शिबिराचे आयोजन समर्थ संस्था व आय. व्ही. आर. सि. एल. मार्फत करण्यात आले होते. यावेळी एड्स जनजागृती व्याख्यान एच. आय. व्ही. रक्त तपासणी, हिमोग्लोबीन, शुगर, एच. बी. रक्तगट तपासण्या करून त्वचा रोग, प्राथमिक स्वरुपाच्या आजारांवर औषधोपचार देण्यात आला. यावेळी लोहोप आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. बी. राठोड व त्यांचे आरोग्य पथक, चौक आरोग्य केंद्राचे समुपदेयक,



अशोक लोंढे, काशिनाथ खुडे, दयाराम बनगडे, आय. व्ही. आर. सिएलचे प्रोजेक्ट मॅनेजर सुनील गायकवाड, शिवानंदन पानीग्रही संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील आदी उपस्थित होते.

कन्ट्रक्शन लेबरमध्ये एच. आय. व्ही. संसर्ग होण्याचे प्रमाण जास्त असल्याने अरविंद पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनातून या आजाराची संपूर्ण माहिती देऊन या आजारासंबधीचे गैर समज दूर करण्याचा प्रयत्न केला. व्याख्यानानंतर एकूण ८५ कामगारांनी स्वत: एच. आय. व्ही. तपासणी करून घेतली हा बदल जागृतीच्या माध्यमातून होत असल्याचे अरविंद पाटील यांनी सांगितले.

दैनिक कर्नाळा
जनहिताचा निर्वाळा
● रायगड ● सोमवार, दि. २७ जुलै, २०१५ ● www.ekarnala.com
●Posting Date

## श्री समर्थ सामाजिक संस्था रसायनी अंतर्गत

# गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

रसायनी/प्रतिनिधी

श्री समर्थ सामाजिक संस्था रसायनी अंतर्गत परीसरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. यावर्षीही आदिवासी गरजू साक्षरता उपक्रमाअंतर्गत दोनशे विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्याकरीता शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाची सुरूवात लोकमान्य टिळक जयंतीचे औचित्य साधून करण्यात आली. यावेळी रा.जि.प. आंबिवली शाळेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वडगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच डि.सी. मालकर, समाजसेवक यादव अण्णा सुवर्णा यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.




दरम्यान परीसरातील आदिवासी व गरजू विद्यार्थ्यांना किमान बारावीपर्यंत शिक्षण घेता यावे या उद्देशाने परिसरातील आंबिवली, वासांबे वाडी, शिंदीवाडी, खोंडावाडी, पराडेवाडी व शिवनगर वाडी आदि भागातील जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना व[...] रेनकोट, दप्तर आदि शा[...] साहित्य वाटप करण्[...] येणार असल्याचे श्री स[...] सेवाभावी संस्थेचे अ[...] अरविंद पाटील य[...] बोलताना सांगितले. [...] कार्यक्रमाकरीता शा[...] मुख्याध्यापिका बावी[...] वडगाव ग्रामपंचायतीचे म[...] सरपंच ज्ञानेश्वर माल[...] संस्थेचे अध्यक्ष अ[...] पाटील, समाजसेवक य[...] अण्णा सुवर्णा व शिक्ष[...] उपस्थित होते.

---

[...]जुलै ते ०१ ऑगस्ट २०१५ ३
सा. रसायनी टाइम्स

# विद्यार्थ्यांनी काढली पर्यावरण स्वच्छता अभियान जनजागृती पदयात्रा

मोहोपाडा/प्रतिनिधी

श्री समर्थ सेवाभावी संस्था आणि जनता विद्यालय मोहोपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा परिसरातून शुक्रवार दि.१७ रोजी दुपारी ११ वाजता शालेय विद्यार्थ्यांनी पर्यावरण, स्वच्छता अभियान व जनजागृती पद रॅली काढली. या रॅलीला जनता विद्यालयातून प्रारंभ झाला. सदर रॅली आळी आंबिवली, वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत, नवीन पोसरी अशी काढण्यात आली. या पद रॅलीत शालेय विद्यार्थ्यांनी शिस्तबध्द पध्दतीने दोन रांगा लावल्याचे चित्र दिसून आले. यावेळी 'स्वच्छ भारत सुंदर भारत', आरोग्य हाच खरा दागिना, पर्यावरणाचे संतुलन राखा अशाप्रकारचे फलक हातात घेवून विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी केली.




सदर पद रॅली पुन्हा मोहोपाडा जनता विद्यालयात आल्यानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. या रॅलीत श्री समर्थ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील, यादव अण्णा सुवर्णा, जनता विद्यालय शाळेतील शिक्षक व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

रसायनी टाइम्स रविवार दि. ११ ते १७ सप्टेंबर २०२२
ना नं.: NMB/105/2022-24

# सामाजिक कार्यकर्ते अरविंद पाटील भारत गौरव पुरस्काराने सन्मानित

**रसायनी टाइम्स वृत्तसेवा**

सुशोभिता वेल्फेअर असोसिएशन आणि ह्युमनवेल अँड अँटीकरप्शन इंडिया फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा भारत गौरव पुरस्कार २०२२ रसायनी येथील सामाजिक कार्यकर्ते अरविंद पाटील यांना छत्रपती संभाजी महाराज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या पुरस्कार सोहळ्यास ज्येष्ठ समाजसेविका शोभा कोकितकर, जेष्ठ किर्तनकार



ह.भ.प. कैलास महाराज निचीते, दुर्गवीर अध्यक्ष संतोष हसुरकर, राजाभाऊ चौधरी आदी उपस्थित होते.

# आदित्य बिर्ला कार्बन इंडिया व श्री समर्थ सामजिक संस्था रसायनी अंतर्गत जागतिक एड्स दिनानिमित्त किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी जागृतीपर व्याख्याने....

**पाताळगंगा / प्रतिनिधी**

१ डिसेंबर जागतिक एड्स दिना निमित्त जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. यावर्षी विशेष करुन रसायनी-पाताळगंगा



परिसरातील शाळा-कॉलेज मधील ९ वी ते १२ वी मधील किशोरवयीन विद्यार्थ्यांना व्याख्याना मार्फत एड्सबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी जास्तीत जास्त किशोरवयींन विद्यार्थ्यांना समर्थ संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील व इतर मान्यवरांनी किशोरवयीन होणारे शारीरिक, मानसिक बदल यावर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून एड्स आजाराबद्दलची संपूर्ण माहिती देऊन हा आजार न होण्यासाठी काय खबरदारी घेतली पाहिजे, या आजारा संबंधी असणारे गैरसमज, कलंकित दृष्टिकोन, आजच्या तरुण पिढीचा चंगळवाद पाहता ही तरुणाई कळीमुळे बाधित होऊ नये या उद्देशाने त्यांना याबद्दलचे मार्गदर्शन करण्यात येत आहे. हे संपूर्ण अभियान राबविण्याकरिता आदित्य बिर्ला कार्बन इंडियाचे प्रकाश देसाई (जनरल मॅनेजर-बिर्ला कार्बन पातळगंगा), लक्ष्मण मोरे (समाज विकास अधिकारी बिर्ला कार्बन पातळगंगा) यांचे व परिसरातील सर्व विद्यालयीन शिक्षक वर्ग यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

२ गुरूवार, दि. १ डिसेंबर ते ७ डिसेंबर २०२२ पाताळगंगा टाइम्स

# श्री समर्थ समजिक संस्था रसायनी व बिर्ला कार्बन इंडिया लिमटेड अंतर्गतजागतिक एड्स दिना निमित्त जनजागृती

रसायनी / प्रतिनिधी

१ डिसेंबर जागतिक एड्स दिना निमित्त श्री समर्थ सामाजिक संस्था व बिर्ला कार्बन इंडिया लिमिटेड यांच्या विद्यमाने जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये विद्यार्थी पद रॅली व परिसरातील शाळान मधील ८ वी ते १२ वी मधील किशोरवयीन विद्यार्थ्यांना व्याख्याना मार्फत एड्सबद्दल मार्गदर्शन करण्यात येत आहे. दरवर्षी परिसरातील गावांमध्ये पथनाट्य या माध्यममाद्वारे जागृती करण्यात येत आहे. यावेळी जास्तीत जास्त किशोरवयीन मुलांना जागृत करण्याचा संस्थेचा मानस आहे.



डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय वाशिवली येथील जूनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनची पदरॅली काढण्यात आली, विद्यार्थ्यांना एड्स आजाराबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांनी किशोर वयीन होणारे शारीरिक, मानसिक बदल यावर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून एड्स आजारा बद्दलची संपूर्ण माहिती देऊन त्यांच्या मनातील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. परिसरातील महत्वाच्या ठिकाणी पथनाट्य करण्यात आली सर्व शाळांमध्ये ही जागृती करण्यात येणार आहे.

जागतिक एड्स दिनाच्या या कार्यक्रमास डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय येथील सर्व शिक्षक वर्ग आणि बिर्ला कार्बन इंडिया लिमिटेड यांचे सहकार्य लाभले.

गुरूवार, दि. १८ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट २०२२ पाताळगंगा टाइम्स

३ गुरूवार, दि. १६ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी २०२३



# श्री समर्थ सामाजिक संस्थेतर्फे एम.बी.ए.च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

पाताळगंगा टाइम्स • रसायनी

श्री समर्थ सामाजिक विकास सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून संस्थेचे अध्यक्ष रायगड भुषण अरविंद पाटील हे अनेक वर्ष विद्यालय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास, व्यसनमुक्ती, एड्स या विषयावर मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांमध्ये जागृतीद्वारे बदल घडवण्याचा प्रयत्न करत आहेत.

आजची तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे. या पिढीचा वाढता चंगलवाद पाहता या वयात या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते वाम मार्गाला जाणार नाहीत. त्यांचे शैक्षणिक जीवन सुखकर होऊन चांगले व्यक्तिमत्व घडेल या उद्देशाने अरविंद पाटील हा उपक्रम राबवित आहेत. आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना त्यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे विकसित केले आहे. आज ग्रामस्वराज समिती भानगर-नेरे येथे भारती विद्यापीठ नेरुळ येथील एम.बी.ए. च्या विद्यार्थ्यांच्या एन.एस.एस. कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी

# रसायनीत राजाश्रय वृद्धाश्रम व पाळणा घर सुरु.....

## श्री समर्थ सामाजिक सेवाभावी संस्था रसायनी संचालित

रसायनी / प्रतिनिधी

श्री समर्थ सामाजिक सेवाभावी संस्था अंतर्गत परिसरामधे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. रसायनीतील रायगड भूषण अरविंद पाटील यांनी परिसरात राजाश्रय वृध्दाश्रम व पाळणा घर सुरू केले आहे.



रसायनी पाताळगंगा हा औद्योगिक परिसर असल्याने या परिसराचे शहरीकरण झपाट्याने होत आहे. औद्योगिकरणामुळे स्थलांतरित कामगार मोठ्या प्रमाणात येत असतात. सध्याच्या धावपळीच्या युगात स्त्री-पुरुष दोघेही नोकरी करत असताना त्यांना आई-वडील, मुलांचे संगोपन करणे कठीण होत आहे, याचबरोबर काही निराधार वृद्धांची देखील हेलसांड होऊ नये या उद्देशाने संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण अरविंद पाटील यांनी हा उपक्रम सुरु करण्याचा निर्णय घेतला. यात निराधार वृद्धांकरिता १० बेड आरक्षित ठेवण्यात येणार आहेत.

**ठिकाण** - खाने आंबिवली (स्टेट बँक - एमआयडीसी रोड), पो. रसायनी, ता. खालापूर, जि. रायगड - ४१०२०७